**प्रकल्प प्रवर्तक मे. सुरेश्वरम बायोफ्युएल प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २०७, २२३ व २२४, दारफळ (गावडी), तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांच्या B२ श्रेणी अंतर्गत मंजुर १०५ कि. लि. प्रति दिन क्षमतेचा धान्यांवर आधारित आसवणी प्रकल्पामध्ये मोलॅसिस (बी व सी) /केन सिरप /धान्य यांचा वापर करून १०५ कि. लि. प्रति दिन क्षमतेचा रेक्टीफाईड स्पिरीट (आर. एस.) /एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल (इ. एन. ए.) / इथेनॉल यांचे उत्पादन तसेच ३ मेगावॅट सहविजनिर्मिती प्रकल्पाची स्थापना करण्यासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प प्रवर्तक मे. सुरेश्वरम बायोफ्युएल प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २०७, २२३ व २२४, दारफळ (गावडी), तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांच्या B२ श्रेणी अंतर्गत मंजुर १०५ कि. लि. प्रति दिन क्षमतेचा धान्यांवर आधारित आसवणी प्रकल्पामध्ये मोलॅसिस (बी व सी) /केन सिरप /धान्य यांचा वापर करून १०५ कि. लि. प्रति दिन क्षमतेचा रेक्टीफाईड स्पिरीट (आर. एस.) /एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल (इ. एन. ए.) / इथेनॉल यांचे उत्पादन तसेच ३ मेगावॅट सहविजनिर्मिती प्रकल्पाची स्थापना करण्यासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी **बुधवार, दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी दुपारी १२.३० वाजता** प्रकल्प स्थळावर आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. निखील मोरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. शंकर वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठया संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना



निखील मोरे

पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. सुरेश्वरम बायोफ्युएल प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक २०७, २२३ व २२४, दारफळ (गावडी), तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूर यांनी त्यांच्या B२ श्रेणी अंतर्गत मंजूर प्रस्तावित नविन सी मोलॅसिस/बी हेवी मोलॅसिस/सिरप/यीस्ट/युरिया/ग्रेन/डी फोमिंग ऑईल या कच्च्या मालापासून १०५.० किलोलिटर प्रतिदिन रेक्टीफाईड स्पिरिट (आर.एस.)/ एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल (ई.एन.ए.)/इथेनॉल यांचे उत्पादनाचा मल्टीफिड आसवणी प्रकल्प आणि वीजनिर्मिती § ३.० मेगावॅट प्रकल्प उभारणी संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग बी-२ - आसवणी - ५ (जी), सहविद्युत निर्मिती - १ (ड) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २१-०२-२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १५-०३-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सोलापूर, यांनी प्रत्यक्ष पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार, दिनांक १९ जुलै, मार्च, २०२३ रोजी दुपारी १२. ३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने

व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ४३ / २०२३, व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २३०६२६ - FTS-००७० दिनांक २६/०६/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, सोलापूर, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे जिल्हा - पुणे, | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर | - **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक वृत्तपत्र पुढारी यात मराठीत व स्थानिक दैनिक वृत्तपत्र दिव्यमराठी यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक १८-०६-२०२३ रोजी प्रकाशित केली होती तसेच मराठी भाषेतील जाहिरातीबाबतचे शुध्दीपत्रक दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये दि. २०/०६/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आले होते. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते .

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर,

५) तहसीलदार, तहसील कार्यालय-उत्तर सोलापूर, तालुका- उत्तर सोलापूर,, जिल्हा- सोलापूर,

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- उत्तर सोलापूर, तालुका- उत्तर सोलापूर,, जिल्हा- सोलापूर,

६) ग्रामपंचायत कार्यालय - मौजे वांगी, पडसाळी, वडाळा, दारफळ (गावडी), कळमण, नान्नज या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालय, तालुका- उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूर, मौजे शेळगाव (आर) तालुका - बार्शी, जिल्हा - सोलापूर व मौजे केमवाडी, सावरगाव, काटी या गावांशी संबंधित ग्रामपंचायत कार्यालय, तालुका-तुळजापूर, जिल्हा-उस्मानाबाद,

७) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

८) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

९) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे,

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर,

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांना एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेला नाही.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित,

बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, सदरहू प्रकल्पासाठी एकूण गुंतवणुक रुपये १७५.० कोटी असून सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च - रुपये १,६७५.० लाख, तर आवर्ती खर्च - रुपये १८५.० लाख रुपये आहे.

सदरहू प्रकल्पामुळे सुमारे १५० व्यक्तींना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. त्यात स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होणार आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे -**

१) **श्री. पोपट लक्ष्मण लांडगे, मुक्काम पोस्ट - दारफळ (गावडी) गाव, तालुका-उत्तर सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-**

आम्ही प्रकल्पाच्या विरुध्द नाही. पण येथे जी जमिनीवर पीके आहेत, त्यांच्यावर काही नुकसान होईल का?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की, शेतकरी म्हणून तुमचा प्रश्न अगदी रास्त वाटत आहे. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे हा एग्रो बेस्ड म्हणजे शेतीवर आधारित प्रकल्प आहे.

या प्रकल्पातून पीकांवर वाईट परिणाम होईल असे कुठलेच घटक बाहेर पडत नाहीत. प्रकल्पातून कुठलेच सांडपाणी प्रकल्पाबाहेर जाणार नाही. प्रकल्पात बॉयलरसाठी इंधन म्हणून बगॅस (प्रकल्पातील ऊसाचे चिपाड, पाला) वापरण्यात येणार आहे. प्रकल्प उत्पादनासाठी कुठलेही केमिकल वापरले जात नाही. तर मका, ज्वारी, बाजरी, तांदूळ हे कच्चा माल म्हणून वापरणार आहोत. त्यामुळे येथील शेतक-यांच्या पीकांना बाजारभाव मिळणार आहे. प्रकल्पात कोणत्याही घातक पदार्थाचे उत्पादन होत नाही.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील कर्मचारी व अधिकारी कारखान्याची वेळोवेळी पाहणी करत असतात. प्रकल्पात ऑनलाईन मॉनिटरिंग सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे.

उपस्थितांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांच्या काही सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी असल्यास त्या लेखी किंवा तोंडी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

आयोजक यांनी सागितले की, बैठीकीत उपस्थित करण्यात आलेल्या सर्व सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृतात समावेश करुन ते इतिवृत अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मा. अध्यक्षांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तांत्रिक समिती स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा विचार करणार आहे. या प्रकल्पास मान्यता देणे किंवा न देणे याबाबत समिती पुढील निर्णय घेत असते.

आयोजक यांनी सर्व उपस्थितांचे जनसुनावणीस राहून आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविले याबद्दल आभार व्यक्त करुन मा. अध्यक्षा यांच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

प्राप्त ०६ लेखी निवेदने/पत्रे/तक्रार अर्ज सोबत जोडलेली आहेत. व याबातचा तपशील खालीलप्रमाणे:-

१) सरपंच, गामपंचायत वांगी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर
२) राईट वे ग्लोबल ऑर्गनायझेशन, तेलंगना



मोरे

३)	मेट्रो अरबन अँन्ड रुरल डेव्हलॉपमेंट सोसायटी, हैद्राबाद

४)	रुरल एनवॉर्नमेंट एज्युकेशन अँन्ड हेल्थ अवेअरनेस सोसायटी, हैद्राबाद

५)	सेव्ह अर्थ, मेट्रो अरबन अँन्ड रुरल डेव्हलॉपमेंट सोसायटी, तेलंगना

६)	वूटकुरी सुनंदा रेड्डी, पर्यावरणतज्ञ, धरित्री पर्यावरण परिरक्षण समस्थ, तेलंगना

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

**(निखिल मोरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
सोलापूर

**(शंकर वाघमारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
पुणे

**( शमा पवार )**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा-सोलापूर